# प्रेसनोट

दि. २७/१२/२०२३

**ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील उपअधीक्षक कार्यालय येथील उदवाहकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | जालिंदर चंद्रकांत कुंभार, वय ५५ वर्ष, पद - उदवाहक, उपअधीक्षक कार्यालय, ससून हॉस्पीटल, पुणे. (वर्ग-४) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २९/११/२०२३, ३०/११/२०२३, १८/१२/२०२३, १९/१२/२०२३ |
| सापळा दिनांक | २७/१२/२०२३ |

ठिकाण :- ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे चे मुख्य प्रवेशद्वाराजवळ.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी दि. ०१/०६/२०२३ रोजी ससून हॉस्पीटल, पुणे येथे त्यांचे रक्कम रुपये १,४३,०००/- चे वैद्यकीय बिल प्रतीपुर्तीसाठी दाखल केले होते. तक्रारदार हे सदर बिलाचे चौकशीसाठी उपअधीक्षक कार्यालय, ससून हॉस्पीटल, पुणे येथे गेले असता, तेथील लोकसेवक जालिंदर कुंभार यांनी वैद्यकिय बिलाचे मंजुरीसाठी बिलाच्या दोन टक्के रक्कमे प्रमाणे ३,०००/- रूपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक जालिंदर कुंभार यांनी तक्रारदार यांचेकडे वैद्यकीय बिल मंजुरीसाठी ३,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, लोकसेवक जालिंदर कुंभार यांनी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये ३,०००/- (तीन हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक श्रीमती माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.